# श्री चंद्रला परमेश्वरी कथा स्तोत्र

# श्री चंद्रलाम्बा कथा स्तोत्र

ॐ

*।। श्री गणेशाय नमः ।।*

*।। श्री चंद्रलः परमेश्वरी माता प्रसन्न ।।*

*।। चंद्रलाम्बा प्रसन्न ।।*

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।<br>
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।<br>
प्रथम असे तुझे पुजन । जय गणाधिप गजानन ।<br>
आरंभिचा तुझा मान । नमन माझे तुजप्रती ।।१।।<br>
सरस्वती हंसवाहना । दक्षिण करी असे वीणा ।<br>
विद्यावती शुभ्रवसना । वंदना माझी स्विकारावी ।।२।।<br>
श्री गुरुराया संतराज्जना । सकल श्रेष्ठ मुनिजना ।<br>
पंढरीनाथा नारायणा । नमन माझे असो सदा ।।३।।<br>
नमिते चंद्रलांबा तुज नित्य । शिरी आशिर्वाद असू देत ।<br>
करीता महाराष्ट्र भाषेत । रचना तुझ्या गाथेची ।।४।।<br>
गजानन महाराज शेगांववासी । खंडोबा जेजूरी निवासी ।<br>
एकविरा माता निजग्रामवासी । स्फूर्ती द्यावी मजलागी ।।५।।

बारा स्थाने महादेवाची । अष्ट ग्रामे विनायकाची ।
सप्त पिठे मातृकांची । वंद्य सदाची मजला ॥६॥
राम नामाचा महिमा अगाध । ज्याने केला रावणवध ।
बिभिषणासी दिधले राज्यपद । त्याचे पद वंदी मी ॥७॥
श्रोते आपण सुजाण । तैसेचि भाविक जन ।
यथामती मी कथावर्णन । आदर भावे करीतसे ॥८॥
कथा कन्नड देशीची । वर्णावी चंद्रला परमेश्वरीची ।
मनिषा एक अंतरीची । कृपेने चंद्रला देविच्या ॥९॥
तुझिया कथेच्या निरुपणा । माते तुच माझी प्रेरणा ।
गात असता यशोगाना । मना द्यावी सुमती ॥१०॥
कथा ऐका देवीची । महामाया काश्मिरीची ।
अवधानता श्रुतीची । असू द्यावी श्रोते हो ॥११॥
आपला वडिलपणाचा मान । आणिक सुविद्यतेचा सन्मान ।
मज नसे जरी ज्ञान । प्रयत्न जाणा लहानगा ॥१२॥
नच जाणे मी वृत्त अलंकार । कथा घेतसे आकार ।
सुलभ भाषेचा अविष्कार । श्रोते आपण जाणावा ॥१३॥
करीता परमेशाचे नामस्मरण । होतसे पापक्षालन
श्रोते जाणताचि आपण । मी काय सांगू तुम्हासी ॥१४॥
चंद्रला देवीचे घ्यावे नाम । पुरतील सर्व काम काज ।

नामस्मरण हा उत्तम । भक्तीमार्ग कलीयुगी ।।१५।।
नामे अंबेची गोड । अती । आनंदी परमानंदा कालरात्री ।
तथा गायत्री आणिक किती । वर्णिता न ये मजसी ।।१६।।
कन्नड प्रदेशी गुलबर्गा । जिल्ह्याची ती होय जागा ।
त्याच प्रांती श्री चंद्रला जगा । दर्शन देत असे ।।१७।।
पवित्र सन्नती क्षेत्र । तालुका चितापूर अंकित ।
भिमातीरी सदा स्थित । कल्याण करण्या सर्वांचे ।।१८।।
विशाल भाळी शेंदूर विराजे । लल्लाट कस्तुरी विलेपित जे ।
नयन मनोहर कमलासम.जे । तेजश्री विलासे मुखावरी ।।१९।।
वदनी सुहास्य विलसित । ओठी रक्तिमा विकसित ।
नासिके नथ विभुषित । रत्नखचित मुकुट शोभे शिरी ।।२०।।
कंठी सौभाग्य अलंकार । आणिक मोतियांचे हार ।
कर्णी आभुषणे मत्स्याकार । प्रसन्न वदन अंबेचे ।।२१।।
कुमकुम रेखित तळवे । जैसे की फुलली कमळे ।
जयातूनी आशिश सदा मिळे । श्रध्दा भावे भक्तांना ।।२२।।
बैसलिसे सिंहासनी । सन्मुख मार्कंडेय मुनी ।
सन्नती क्षेत्राच्या बनी । स्थानापन्न झालीसे ।।२३।।
विश्वाचे मूल बीज निर्विकार । जें भक्तासाठी होई साकार ।
मुर्ती कामाक्षीची मनोहर । सुखकारक भक्तासी ।।२४।।

गोजिरी मुर्ती वालुकामय । पाहता मन झाले चिन्मय ।
सानंद चित्त होय । नयन पावे तृप्तता ।।२५।।
सामर्थ्य अंबेचे अलोलिक । सेतुराया झाला नतमस्तक ।
श्रध्दा भाव अधिक । श्रोते असावा आपुला ।।२६।।
आता मुळ कथा घे आकार । श्रोते करीतसे सादर ।
जोडोनी दोन्ही कर । चरणांसी श्री चंद्रलेच्या ।।२७।।
जोशी नामे विप्र एक । होता राजदरबारी पाठक ।
महाराजांस दिनी प्रत्येक । पंचांग वृत्त वर्णितसे ।।२८।।
अनुज एक त्या विप्राप्रती । सुशील ज्याची सौभाग्यवती ।
चंद्रला परमेश्वरी मातेवरती । श्रध्दा तिची अपार ।।२९।।
दिक्षीतांची ही सुता । जोशी कुळाची स्नुषा असता ।
उभय कुळाची कुलदेवता । चंद्रलाम्बा असे ।।३०।।
पूजा अर्चादी करोनी । वंदितसे ती सुहासिनी ।
श्रध्दा महान तिच्या मनी । ठायी अंबा चंद्रलेच्या ।।३१।।
घरी सर्वांचा आदर । सुवासिनी करीतसे फार ।
मनी करी सदविचार । सदाचारी सर्वदा असे ।।३२।।
महाराज एक विजापूरी । जोशी राव तयाचे पदरी ।
राजज्योतिष कथन करी । प्रतिदिनी व्यवस्थित ।।३३।।
कोणे एके दिवशी । स्वये राजज्योतिषी ।

हजर न राहे दरबारासी । परगावी जाणे निमित्ताने ।।३४।।
विप्र म्हणे कनिष्ठ बंधुसी । जाणे असे मज परदेसी ।
उद्या तु जावे राजगृहासी । पंचांग वृत्त कथण्यास ।।३५।।
ऐक तु लक्षपुर्वक । जाणे असे मज अशक्य ।
राजेश्वरासी समय - सुचक । कथन तु करावे ।।३६।।
सूर्याची उदय अस्त गती । चंद्रकला आणिक तीथी ।
इतर ग्रहांची स्थिती । नृपासी त्वा श्रुत करी ।।३७।।
आणिक राजज्योतिष निश्चित । जी घटिका पळे उचित ।
कैसी ग्रहांची असे संगत । सांगण्या राजमंदिरी जावे ।।३८।।
ज्येष्ठ बंधुचे ऐकून कथन । आज्ञा वंदनीय मानून ।
दूसरे दिनी करी भ्रमण । बंधु राजप्रासादाकडे ।।३९।।
अनुज निघाला सत्वरी । विचार अंतरी करी ।
पंचांग कैसे वर्णावे परि । महाराजांसी अचूक ।।४०।।
आला राजप्रासादात । सभा बैसलिसे समस्त ।
आणिक होते पंडित । उपस्थित त्या ठायी ।।४१।।
महाराजांसी करुन वंदन । आसनावरी बैसोनी आपण।
करी पंचांग अवलोकन । उचित समय जाणण्या ।।४२।।
राजा वदे त्या बंधुलागून । कोणत्या चंद्रकलेचा दिन ।
आज असे विप्रनंदन । वर्तमान करी मजसी ।।४३।।

आज पौर्णिमा असे निश्चित । पूर्ण बिम्ब शशांक उदित ।
होईल निशी गगनात । ऐसे अनुज वदला ।।४४।।
अनुज थोडा बावरलेला । हंसा प्रासादी प्रथमची आला।
गडबडोनी कथिता झाला । राजासी चंद्र स्थिती ।।४५।।
परि स्थिती असे विपरित । ती आमावस्येची रात ।
नभी निशीराज नसे विलसित । कथनात नसे सत्यता ।।४६।।
तव दूजा पंडित वदे बादशाहासी । की चूक होय कथनासी ।
आज पौर्णिमा नसे खासी । आमावस तिथी ती ।।४७।।
विप्रबंधु करी चिंतन । न राखताची ध्यान ।
राये केले जे वर्तमान । संपूर्ण असे असत्य ।।४८।।
अमावस असून पुनव - दिन । राजेन्द्रासी केला कथन ।
त्याप्रती होईल अनुशासन । चूक मोठी झालीसे ।।४९।।
तव क्रोध आला नृपासी । म्हणे तु असत्य वदलासी ।
घोर शासन तुजसी । भोगणे प्राप्त आता ।।५०।।
तरीच करील हे मान्य । की तुझे आहे सत्यवचन ।
जरी पूर्ण चंद्रबिंब दैदिप्यमान । सायंकाळी विलसे नभी ।।५१।।
क्षमा याचिली राजापाशी । आला आपुल्या सदनासी ।
विदीत केली पत्नीसी । चिंता आपुल्या मनातली ।।५२।।
पतीसी सांगे पत्नी । जी आपुली कुलस्वामिनी ।

चंद्रलाम्बा संकट - नाशिनी । तिच आता पुजावी ।।५३।।
तिच करील संकट निवारण । मनातली चिंता हरण ।
सर्व दु:खाचे कारण । नाहीसे होईल ।।५४।।
नित्य जाई अंबेच्या देवालया । ती सुलक्षणी जाया ।
म्हणे माते ऐसा प्रसंग कासया । आलासे आम्हावरी ।।५५।।
तेव्हा देवीच्या मंदिरी जाऊन । पूजा अर्चा करुन ।
साष्टांग वंदना घालून । म्हणे माते आम्हा क्षमा करी ।।५६।।
हे चंद्रला परमेश्वरी । तुच आता कृपा करी ।
संकट आले आम्हांवरी । तारण करी त्यातून ।।५७।।
भाऊजी सांगती व्यवस्थित । महाराजांसी पंचांग नित्य ।
जे जे पुसती ते ते सत्य । कथित करीती प्रतिदिनी ।।५८।।
आज झाले अनावधान । अपराध नच केलासे जाणून ।
पतीने सांगितली चूकून । चंद्र स्थिती आजची ।।५९।।
चंद्रलाम्बा तुझे पायी । मी ठेवित असता डोई ।
न मागतसे दूजे काही । दया अंतरु दे महाराजांठायी ।।६०।।
करीता तुझे नामस्मरण । होतसे पापक्षालन ।
आता करावे संकट निवारण । पापहारिणी नाम तुझे ।।६१।।
तुच चंद्रला रमा रुद्राणी । कामाक्षी काम रुपिणी ।
चामुंडा चक्रधारिणी । गुणवर्धिनी म्हणती तुला ।।६२।।

तु महादेवी महाकाली । तु विशालाक्षी भद्रकाली ।
तुच योगिनी दुर्गा माऊली । जय वर्धिनी म्हणती तुला ।।६३।।
हे चंद्रला गायत्री । अंबे तुची कालरात्री ।
असशी तु त्रिगुणात्धात्री । मजवरी आता कृपा करी ।।६४।।
असता गे मी असहाय । परि मागतसे तुझे सहाय ।
सर्वांची तु गे माय । धावोनि ये मजसाठी ।।६५।।
जय जय हे अव्यक्तमुर्ति । जय जय हे कालरात्री ।
नमस्कार माझा तुजप्रती । अपराध पोटी घाल माझे ।।६६।।
जय जय हे जयरुपा । जय जय ज्योतिरुपा ।
जय जय हे निर्विकल्पा । पुण्यदा पापहारिणी ।।६७।।
जय जय हे चंद्रलांबा । जय जय हे जगदंबा ।
भ्रमरी भ्रमरांबा । पार्वती वरदायिनी ।।६८।।
देवीच्या नामाचा गजर । आणिक करीत जय जयकार ।
जोडोनी दोन्ही कर । उभी असे सुवासिनी ।।६९।।
ऐसा करीत असता जय जयकार । तव झालासे चमत्कार ।
तोचि श्रोते सादर । तुम्हालागी करीत असे ।।७०।।
तेव्हा चंद्रलांबा झाली प्रसन्न । म्हणे तुझ्या हातीचे कंकण ।
आकाशी पूर्व दिशेलागून । फेकण्यास सांग पतीसी ।।७१।।
घरी येवोनी ती सांगे पतीसी । कंकण घेवूनी जावे राजगृहासी ।

आकाशी फेकोनी पूर्वेसी । नभी पहावा चंद्रमा ।।७२।।
जेव्हा वर्तला सांज समय । स्मरुनी चंद्रलांबा माय ।
पती कंकण घेवूनी जाय । राजेश्वराच्या महाली ।।७३।।
तो महाराजांसी म्हणे, 'आपण । स्वये चंद्रमा पहावा गगनांत ।
चंद्रला परमेश्वरीसी मनी स्मरुन । विप्रबंधु काय करी ।।७४।।
ते कंकण घेऊनी करी । दिले झोकूनी गगनी दूरी ।
ते स्थिर होई दिगंतरी । जैसे की सुधांशु दिसे ।।७५।।
प्राचिवरी प्रकाशला शशांक । तेज जयाचे अधिक ।
क्षयातीत बींब मोहक । प्रभा पसरे सर्वत्र नभी ।।७६।।
दिसे धवल आणिक महान । ऐसा पुनवेचा चंद्र पाहून ।
तृप्त पावले लोचन । सर्वांचेच तेधवा ।।७७।।
ज्योत्स्ना पसरली सर्वत्र । इंदुतुषार की कुंदकळ्या सुप्त ।
मधोमध निशीराज विराजत । प्रकाश पसरे अवनीवरी ।।७८।।
चांदणे पडले सौख्याचे । तम हरले चिंतेचे ।
उधाण आले आनंदाचे । जनमानसी तेधवा ।।७९।।
महाराज झाले चकित । तैसीच सभा समस्त ।
जमले होते जे जे पंडित । पाहत राहिले चंद्रमा ।।८०।।
चंद्रदर्शन जाहले असोनी । महाराज साशंक होई मनी ।
सेवकांसी आज्ञा देवूनी । धाडीले चहूकडे बारा कोस ।।८१।।

चहुदिशांना बारा कोस । घोडेस्वार गेले खास ।
चंद्र पाहता आले वापस । बादशाहास वृत्त कथिती ते ।।८२।।
चंद्रमा विलसे आकाशी । जाऊनी देखिले चहू बाजूंसी ।
पाहते झाले अष्ट दिशांसी । कोस कोस दुरुनिया ।।८३।।
क्षमा केली विप्रबंधुसी । महाराज निघाले स्वगृहासी ।
आनंद झाला मानसी । महाराजांना तेधवा ।।८४।।
बादशाहाने होऊन प्रसन्न । जोशींना इनाम दिली जमिन ।
चंद्रलाम्बा कृपेकरुन । संकट टळले कुळाचे ।।८५।।
आनंद झाला जोशीबुवांना । चंद्र दिसला सर्वांना ।
ही परमेश्वरीची कृपा जाणा । म्हणूनी चंद्रलांबा नाम तिचे ।।८६।।
कनिष्ठ जोशीरावांनी । अंबेस पुनश्च अभिवादोनी ।
म्हणे, 'हे जगत्‌जननी । ऐसीच राहो तुझी कृपा ।।८७।।
संकट टळले आता । दु:खाची नुरे वार्ता।
दूर झाली सारी चिंता । तुझ्याच आशिर्वचने ।।८८।।
ब्राह्मणाघरी झाला संतोष । अंबा रक्षी अहर्निश ।
पुरले सर्व मनिष । सुखी जाहले सर्व जण ।।८९।।
कथा वर्णिली सुरस । श्रोते परमेश्वरीची तुम्हास ।
ऐकता लाभो सुयश । हाचि मानस जाणावा ।।९०।।
चद्रला परमेश्वरीची गाथा । आनंदे श्रोते वाचता ।

ऐकता नुरावी व्यथा । हीच प्रार्थना श्री चरणी ।।९१।।
चंद्रला देवीच्या पुजनी । प्रकाश मिळो जीवनी ।
सुख शांती लाभोनी । मार्ग होवो सुकर ।।९२।।
देवीवरी श्रध्दा ठेवोनी । नाम घ्यावे चंद्रला मनी ।
पावेल ही जगतजननी । संदेह मनी धरु नका ।।९३।।
सदा करावे सत्कर्म । हाचि असे सृजनधर्म।
परोपकार जो उत्तम । प्रिय असे सर्व देवतांसी ।।९४।।
देवीनेच दिली मती । तिची कथा रचण्याप्रती ।
कथन केली तुम्हाप्रती । श्रोते गोड मानावी ।।९५।।
संत श्री दासगणु रचित । श्री गजानन महाराजांचे स्तोत्र ।
वाचित असता मनात । इच्छा मज जाहली ।।९६।।
चंद्रलांबा कुलस्वामिनी । मधुर तिची कहाणी ।
ओवी छंदात गुंफुनी । व्यवस्थित रचावी ।।९७।।
तदनुसार ही रचना । शुध्द पक्ष ज्येष्ठ महिना ।
सप्तमीचा दिन जाणा । शके एकोणिसशे नऊसी पुर्ण झालीसे ।।९८।।
हे चंद्रलांबा कुलदेवता । तुच असशी इष्ट देवता ।
कल्याण करी गे आता । आमुच्या सकल कुलाचे ।।९९।।
तव सेवा घडो सदा । मजसी लाभो आरोग्य संपदा ।
माझे मस्तक लीन सर्वदा । तुझ्याच चरणी राहू दे ।।१००।।

चित्ती असु दे समाधान । तृप्त राहो सदा मन ।
चंद्रलांबा तुझी आठवण । जन्मन्मांतरी राहू दे ।।१०१।।
एकच आहे आस । संकटी यावे सहाय्यास ।
प्रयत्ना नेई ध्येयास । हाक तुजला घालता ।।१०२।।
जरी भूल कुठे असे झाली । क्षमा करी गे मज माऊली ।
आणिक कृपेची सावली । नित्य राहू दे सर्वांवरी ।।१०३।।
कथारुपी ही माला । तव कंठी अर्पितसे बाला ।
स्विकारुनी ह्या सेवेला । आशिर्वाद मज द्यावा ।।१०४।।
तुजसी कैसे भजावे । मज न ठावे याहून बरवे ।
तुजसी काय मी अर्पावे । जरी पात्रता नसे मज ।।१०५।।
तुझ्याच प्रेरणेने लिहिता । अर्पण करण्या मज न योग्यता ।
इच्छिले सारे तुच देता । तुझिया भक्तांना ।।१०६।।
पदकमलावरी शीर ठेविता । मनोगता यावी पुर्तता ।
कृपादृष्टी पाहे एकदा । आता सोसवेना मज झळ ।।१०७।।
चंद्रलांबा ही तुझी कहाणी । अर्पण करीते तुझ्याच चरणी ।
बेन्द्रे कुळाची नंदिनी । निलीमा तुज वंदितसे ।।१०८।।
।।श्री चंद्रला परमेश्वरी माता अर्पणमस्तु।।
।। श्री चंद्रलांबा प्रसन्न ।।
शुभं भवतु ।

## आरती १

।। श्री चंद्रला परमेश्वरी प्रसन्न ।।

जय देवी जय देवी जय श्री चंद्रले ।
स्थानक सन्नतीपुरी सुरवर तारीले ।। जय देवी......।।धृ।।

भीमातीरी अंबे धरीले अवतार ।
वामांगी महाकाली विश्व आधार ।
मिरवितो भैरव दक्षिण सुंदर ।
सन्मुख मार्कंडेय मुनी वसे थोर ।। जय देवी......।।१।।

चतुर्भुज दिसशी नयनी सुंदरी ।
शंख चक्र गदा त्रिशूल धारी ।
श्वेतांबर वरधर तु योगीश्वरी ।
रत्नखचित मुकुट शोभतो शिरी ।। जय देवी......।।२।।

कर्णी कनक पात्र वर्तुळाकार ।
कमल नयन अंजन मिरवी सुंदर ।
ललाटी कस्तुरी भाळी शेंदूर ।
प्रसन्न वदनी अंबे भक्त साकार ।। जय देवी......।।३।।

आरुढ सिंहासनी होऊन चंद्रला ।
सैतुरायां षट्पद सुपात्रशीला ।

सुरवरी पुष्पाचा वर्षाव केला ।
उदो उदो कार नाद उमटला ।। जय देवी......।।४।।
चतुर्वेद तेही तव महिमा वर्णिती ।
भक्त जनांची वांछा ते तु पुर्ण करिसी ।
बालक नरहरी तुज करितो विनंती ।। जय देवी......।।५।।

## आरती क्र. २

जय देवी जय देवी जय श्री चंद्रलांबा ।
आरती ओवाळीते, तुजला जगदंबा ।। जय देवी.....।।धृ।।
भिमेच्या तिरी, सन्नती पुरी ।
तु वास करी, हे जगदेश्वरी ।। जय देवी......।।१।।
माथा शेंदूर, तव विशाल नेत्र ।
मनी होई हर्ष, पाहता तुझे सुचित्र ।। जय देवी......।।२।।
वदनी प्रसन्नता, तव देही मोहकता ।
प्रसन्न होशी भक्ता, चरणी ठेविता माथा ।। जय देवी......।।३।।
तुझिया सामर्थ्ये, अमावस होई पुनम ।
लखलख प्रकाश पडे, हरुन जाई तम ।। जय देवी......।।४।।
प्रसन्न होऊनी, कृपा करी आता ।
निलीमा विनवी माता, उरावी नच आपदा ।। जय देवी......।।५।।

।श्री चंद्रलांबा अष्टोत्तर शत नाम स्तोत्रः ।

चंद्रलांबा महामाया शांभवी शंखधारिणी ।
आनंदी परमानंदा कालरात्री कपालिनी ॥१॥
कामाक्षी वत्सला प्रेमा काश्मिरी कामरुपिणी ।
कौमोदकी कौलहंत्री शंकरी भुवनेश्वरी ॥२॥
खड्गहस्ता शूलधरा गायत्री गरुडासना ।
चामुंडा मुंडमथना चंडिका चक्रधारिणी ॥३॥
जयरुपा जगन्नाथा ज्योतिरुपा चतुर्भूजा ।
जयनी जीवनी जीवा जीवना जयवर्धिनी ॥४॥
तापघ्नी त्रिगुणात्धात्री तापत्रय निवारिणी ।
दानवांतकरी दुर्गा दीनरक्षा दयापरा ॥५॥
धर्मत्धात्री धर्मरुपा धन धान्य विवर्धिनी ।
नारायणी नारसिंही नागकन्या नगेश्वरी ॥६॥
निर्विकल्पा निराधारी निर्गुणा गुणवर्धिनी ।
पद्महस्ता पद्मनेत्री पद्मा पद्मविभुषिणी ॥७॥
भवानी परमेश्वर्या पुण्यदा पापहारिणी ।
भ्रमरी भ्रमरांबाचा भीमरुपा भयप्रदा ॥८॥
भाग्योदयकरी भद्रा भवानी भक्तवत्सला ।

महादेवी महाकाली महामुर्ती महानिधी ।।९।।
मेदिनी मोदरुपाच मुक्ताहार विभुषणा ।
मंत्ररुपा महावीरा योगिनी योगधारिणी ।।१०।।
रमा रामेश्वरी ब्राह्मी रुद्राणी रुद्ररुपिणी ।
राजलक्ष्मी राजभूषा राज्ञी राजसुपुजिता ।।११।।
लक्ष्मी पद्मावती च अंबा ब्रह्माणि ब्रह्मधारिणी ।
विशालाक्षी भद्रकाली पार्वती वरदायिनी ।।१२।।
सगुणा निश्चला नित्या नागभूषा त्रिलोचनी ।
हेमरुपा सुंदरी च सन्नती क्षेत्रवासिनी ।।१३।।
ज्ञानदात्री ज्ञानरुपा रजो दारिद्र्यनाशिनी ।
अष्टोत्तर शतं दिव्यं चंद्रला प्रितीदायकं ।
त्रिवार पठते नित्यं सर्वकामनावाप्नुयात ।
इति श्री मार्कंडेयपुराणे सन्नतीक्षेत्रमहात्म्यै।
श्री चंद्रला अष्टोत्तर शत नाम स्तोत्रं संपुर्णम् ।।

*श्री चंद्रला परमेश्वरी माता की जय ।*

लेखिका
कै. निलीमा बेन्द्रे
C/o. दिनकर विष्णू बेन्द्रे
२८, गरुड कॉलनी, देवपूर धुळे.

मुद्रक- नवशक्ती ऑफसेट, ✆ २११३७